# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. ३८ अंतर्गत जयताळा बस स्टॉप ते श्री. पारधी यांचे
**{सा.बां.वि. झोन क्र. ०१}** घरापर्यंत व भाऊचा धक्का ते एकात्मतानगर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत रु. ५७,५६,००८/- (रु. सत्तावन्न लक्ष छपन्न हजार आठ फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. A४२००१४७०५१३ अंतर्गत विभागाद्वारे तयार केलेले आहे. सदर्हू रु.५७,५६,००८/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. A४२००१४७०५१३ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

१. प्रस्तावित काम हे पद क्र. A४२००१४७०५१३ अंतर्गत प्रस्तावित असुन सदर्हू कामास सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात, सदर्हू पदा अंतर्गत राशी रु. ५७,५६,००८/- चे प्रावधान प्राप्त आहे.

२. या कामास मा. मुख्य अभियंता यांनी SE/PWD/T.S./३५४/२०२३-२४ दिनांक ०४/१०/२०२३ अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान केलेली आहे.

३. सविस्तर टिप्पणी नस्तीत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 576/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 25/10/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लक्ष्मीनगर झोन क्र. ०१ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. ३८ अंतर्गत जयताळा बस स्टॉप ते श्री. पारधी यांचे घरापर्यंत व भाऊचा धक्का ते एकात्मतानगर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत रु. ५७,५६,००८/- (रु. सत्तावन्न लक्ष छपन्न हजार आठ फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. A४२००१४७०५१३ अंतर्गत विभागाद्वारे तयार केलेले आहे. सदर्हू रु.५७,५६,००८/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. A४२००१४७०५१३ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**